मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील रुग्णालये महापालिकेच्या रडारवर

## दिल्ली दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर 'फायर सेफ्टी'ची होणार तपासणी : महापालिका हद्दीतील तब्बल 623 रुग्णालयांना दिली पत्रे

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिल्लीतील एका रुग्णालयाला भीषण आग लागली. या दुर्घटनेत ७ मुलांचा होरपळून मृत्यू झाला, तर इतर ५ नवजात बालके गंभीर जखमी झाली. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रुग्णालये, दवाखाने हे अग्निशमन विभागाच्या रडारवर आली आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल ६२३ रुग्णालयांना अग्निशमन विभागाकडून नोटीस पाठवून रुग्णालयअंतर्गत फायर सुरक्षा यंत्रणा अद्ययावत आहेत का? या संदर्भात फायर सुरक्षा यंत्रणांकडून तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील सर्व खासगी रुग्णालयांच्या फायर सुरक्षा यंत्रणा अलर्ट असल्याची खातरजमा करण्यात येणार आहे. वाढती उष्णता आणि विद्युत शॉर्ट सर्किट घटनांमुळे दरवर्षी रुग्णालयांना लागलेल्या आगीचा धोका वाढत आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने




राज्यातील रुग्णालये, आरोग्य केंद्रांना अशा विनाशकारी घटना टाळण्यासाठी सक्रिय उपाययोजना करण्यासाठी आदेश दिले आहेत.

त्याशिवाय दिल्लीतील एका हॉस्पिटलला लागलेल्या आगीत निष्पाप बालकांचा मृत्यू झाला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेचा अग्निशमन विभाग अलर्ट झाला आहे. शहरातील खासगी रुग्णालये, दवाखाने, क्लिनिक अशा एकूण ६२३ रुग्णालयांना नोटीस देण्यात आल्या आहेत. त्या नोटीसद्वारे सर्वांना दहा दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील सर्व रुग्णालये, दवाखाने व्यवस्थापकांनी अंतर्गत फायर सुरक्षेसाठी केलेल्या उपाययोजना, बसवलेल्या यंत्रणा अद्यावत आहेत का? तसेच रुग्णालयाला अग्निशमन विभागाचा 'ना हरकत' दाखला घेणे बंधनकारक केले आहे.

स्थानिक अग्निशमन विभागाकडून अग्निसुरक्षा 'ना-हरकत' प्रमाणपत्राचे वार्षिक नूतनीकरण करावे लागणार आहे. यामध्ये अद्ययावत अग्निसुरक्षा योजना, उपकरणे देखभाल आणि कर्मचारी प्रशिक्षणाचे रेकॉर्ड सबमिट करणे समाविष्ट करावे लागणार आहे. सर्व कर्मचाऱ्यांसाठी अग्निरोधक, आपत्कालीन कार्यपद्धती आणि

### या सुरक्षा यंत्रणेची होणार तपासणी

**» शहरातील सर्व रुग्णालये, हॉस्पिटलमधील अग्निशामक उपकरणे, हायड्रंट्स आणि अलार्मची तपासणी होईल. यामध्ये विझवणाऱ्या यंत्रांच्या कालबाह्यता तारखा तपासणी, हायड्रंट्स उपलब्ध आहेत आणि पाण्याचा पुरेसा दाब आहे, संपूर्ण सुविधेमध्ये फायर अलार्म कार्यरत आणि ऐकू येण्यासारखे आहेत का? याची खात्री करणे. हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागासारख्या अतिसंवेदनशील भागात, इलेक्ट्रिकल ऑडिट केले आहे का, ऑक्सिजन टाक्या किंवा पाईप ऑक्सिजन असलेल्या भागात, उष्णतेच्या स्रोतांवर कडक धूम्रपान न करण्याची धोरणे, नियंत्रणे लागू करा. चिन्हांनी या भागांना स्पष्टपणे चिन्हांकित केले पाहिजे. कर्मचाऱ्यांना उच्च ऑक्सिजन वातावरणाशी संबंधित जोखमींचे प्रशिक्षण दिले पाहिजे. सर्व रुग्णालयांच्या भागात, विशेषत: रुग्णांच्या खोल्या, सामान्य भागात फायर स्मोक डिटेक्टर, फायर अलार्म स्थापित केले आहेत का, याची खात्री करा. ज्वलनशील सामग्री ओळखणे, अग्नि-प्रतिरोधक पर्याय उपलब्ध आहेत का, रुग्णांच्या काळजी क्षेत्रामध्ये ज्वालाग्राही सामग्री बदलण्यासाठी सामग्रीचे ऑडिट केले आहे का? यासह आदी तपासणी करण्यात येणार आहे.**

अग्निशामक उपकरणांचा वापर याविषयी प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावा लागणार आहे. आपत्कालीन निर्गमन अडथळ्याशिवाय होणे आवश्यक आहे.

दरम्यान, महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून सर्व रुग्णालये, दवाखाने यांना अगोदर सुरक्षा यंत्रणा अद्यावत असल्याची माहिती द्यावी लागेल. त्यानंतर सर्व फायर सुरक्षा यंत्रणेची तपासणी अग्निशमन अधिकाऱ्यांकडून केली जाणार आहे. त्यामुळे महापालिका हद्दीतील सर्व रुग्णालये, दवाखाने यांना फायर सुरक्षा यंत्रणा अद्ययावत करावी लागणार आहे.

---

# मंत्रिपदासाठी पिंपरी-चिंचवड शहरातून मोर्चे बांधणी

## आमदार अण्णा बनसोडे यांच्या माध्यमातून अजितदादा 70 वर्षाचा अनुशेष भरुन काढतील : अजित गव्हाणे यांचा विश्वास

**पिंपरी | प्रतिनिधी**

आमदार अण्णा बनसोडे यांना मंत्रिमंडळाच्या विस्तारामध्ये स्थान मिळावे यासाठी पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी अजितदादा गट पक्षाच्या शहराध्यक्ष अजित गव्हाणे व विविध सेलच्या वतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे जोरदार मागणी केली आहे. राज्यस्तरावर मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा सुरू असताना आमदार अण्णा बनसोडे यांचे नाव मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आघाडीवर असून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल अशी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खात्री आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या ७० वर्षांचा अनुशेष बनसोडे यांच्या मंत्रीपदामुळे भरून निघेल असा विश्वास पक्षाचे अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला.

अजितदादा पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून राज्यभर ओळख असलेले आमदार बनसोडे यांचा शहरातील दांडगा जनसंपर्क तसेच नुकत्याच झालेल्या



लोकसभा निवडणूकीत पिंपरी विधानसभा मतदारसंघातून खासदार श्रीरंग बारणे यांना मिळालेले मताधिक्य याच्या बळावर आमदार बनसोडे यांचा मंत्रीपद देऊन शहरातील सामान्य कार्यकर्ताला व समाजाला न्याय देण्याचे काम होईल अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. शहरातील विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार बनसोडे यांना मंत्रिपद मिळावे यास आशायाची निवेदने उपमुख्यमंत्र्यांकडे पाठवले आहेत.

यामध्ये शहराचे अध्यक्ष अजित गव्हाणे महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष संजय औसारमल , ओबीसी सेलचे अध्यक्ष विजय लोखंडे, कार्याध्यक्ष फजल शेख, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष युसुफ कुरेशी, सेवा दल शहराध्यक्ष महेश झपके, झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष संतोष निसर्गंध आधी पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. एकंदरीत शहरातून आमदार बनसोडे यांना मंत्री पद मिळावे यासाठी जोरदार मोर्चे बांधणी होत असताना दिसून येते.

# ‘निर्मलवारी’चा गिरीष महाजनांकडून पूर्वतयारीचा आढावा

## स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी आवश्यक नियोजन करा - ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन

**पुणे | प्रतिनिधी**

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासह स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी बारकाईने नियोजन करा, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित निर्मलवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, उपायुक्त समीक्षा चंद्राकार, वर्षा लड्डा-उंटवाल, विजय मुळीक, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, तसेच सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (दुरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.



मंत्री गिरीष महाजन म्हणाले, यावर्षी पालखी सोहळ्यासाठी गतवर्षीपेक्षा अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पालखी सोहळ्यासाठीची कामे पारदर्शकता ठेऊन वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. पंढरपूर येथे पालखी तळावर पुरेशा प्रमाणात आणि मोठ्या आकाराच्या कचराकुंड्या ठेवाव्यात.

निर्मलवारीच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक जिल्ह्यातील स्वयंसेवक, सेवाभावी संस्था, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत आवाहन करावे. पंढरपूर शहरातील वीज पुरवठा अखंडित राहील याची दक्षता घ्यावी. पिण्याच्या पाण्याचा स्रोतांच्या ठिकाणी आवश्यक असल्यास जनरेटरची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. पावसाच्या पार्श्वभूमीवर पालखी मुक्कामाच्या ठिकाणी चांगली व्यवस्था होईल याकडे लक्ष द्यावे.

टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही निटपणे होईल याकडे लक्ष देण्यासोबत त्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी. जळगाव जिल्हा परिषदेने संत मुक्ताबाई पालखी सोहळ्यासोबत दोन पिण्याच्या पाण्याचे टँकर पंढरपूरपर्यंत उपलब्ध करुन द्यावेत. पालखी मार्गावरील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांची स्वच्छता व अन्न शुद्धतेची खात्री करावी. तसेच पंढरपूर शहरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी वाढीव मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. पालखी सोहळ्यादरम्यान पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील गिरीष महाजन यांनी दिली.

प्रधान सचिव डवले यांनी निधी उपलब्धतेबाबत माहिती दिली. पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या कामांचे कार्यादेश तातडीने देऊन काम सुरू करावीत. पालखी सोहळ्यासंबंधातील कामे वेळेवर पूर्ण होतील याद्दष्टीने नियोजन करावे, असे ते म्हणाले.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. यावर्षी फिरते शौचालय आणि स्वच्छतेसाठी मनुष्यबळ अधिक संख्येने वाढवण्यात आले आहेत. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी, प्रथमोपचार पेट्या, निवारा केंद्र, हिरकणी कक्ष आदी सुविधांसोबत वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील अश्वांचे अंकलीहून प्रस्थान

## शासकीय तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालयांचे ‘थर्ड पार्टी’ ऑडिट कागदावर : नियमापेक्षा कित्येकपट अधिक मोबदला

**पुणे | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात अग्रभागी असणाऱ्या देवाच्या आणि स्वाराच्या अश्वांनी निर्जला एकादशीच्या मुहुर्तावर अंकली (ता. चिकोडी, जि. बेळगाव, कर्नाटक) प्रस्थान ठेवले. अंकलीहून पायी प्रवास करीत हे अश्व पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी २८ जून रोजी आळंदीमध्ये पोहोचतील. आळंदी येथील ज्ञानेश्वर मंदिरातून २९ जून रोजी पालखी सोहळा प्रस्थान ठेवणार आहे.

अश्वांच्या प्रस्थान सोहळ्यास श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजीराजे शितोळे सरकार, युवराज विहानराजे शितोळे सरकार, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, माऊली गुळुंजकर, पालखी सोहळ्याचे मानकरी योगेश आरु, योगीराज कुऱ्हाडे, राहुल भोर, सरपंच सत्यवान बवले यांच्यासह वारकरी उपस्थित होते. पालखी सोहळा सुरू झाला तेव्हापासून श्रीमंत शितोळे सरकार यांचे अश्व आणि पालखी सोहण्यात रात्री मुक्कामाचे ठिकाणी तंबू देण्याची परंपरा आहे.



अंकली येथील शितोळे सरकारांच्या राजवाड्यात अश्वांचे विधिवत पूजन आणि धार्मिक पूजा विधी झाल्यानंतर अश्वांची नगर प्रदक्षिणा झाली. हरिनामाच्या गजरात या अश्वाचे आळंदीकडे प्रस्थान झाले. हे अश्व मिरज (१८ जून), सांगलवाडी (१९ जून), इस्लामपूर पेठनाका (२० जून), वहागाव (२१ जून), भरतगाव (२२ जून), भुईंज (२३ जून), सारोळा (२४ जून), शिंदेवाडी (२५ जून), पुणे (२६ आणि २७ जून) असा प्रवास करीत २८ जून रोजी आळंदी येथे पोहोचतील, असे महादजी राजे शितोळे सरकार यांनी सांगितले.

### काय असते मानाच्या अश्वांचे महत्त्व?

माऊलींच्या पालखी रथापुढे दोन अश्व चालत असतात. यापैकी एक मुख्य मानाचा अश्व तर दुसरा ध्वजधारी यांचा अश्व असतो. मानाच्या अश्वाच्या शरीरावर असलेल्या शुभ खुणा, भवऱ्या, कंठावरील देव मणी, पायावरील पद्य अशा खुणा पाहून त्यांची निवड केली जाते. या अश्वांच्या पाठीवर जन्मल्यापासून कोणीही बसलेले नसते. हे अश्व राजवैभवाचे प्रतीक मानले जातात. त्यामुळेच पालखी सोहळ्याला वैभव प्राप्त झाले आहे. पालखी सोहळ्यामध्ये उभे आणि गोल रिंगण असते. याच रिंगण सोहळ्यात हे अश्व धावतात. त्यावेळेस कधी पुढे ध्वजधारी यांचा अश्व असतो तर कधी मानाचा अश्व पुढे असतो. ज्या ठिकाणाहून हे अश्व धावत असतात, त्या ठिकाणची माती वारकरी बांधव आपल्या भाळी लावतात. अशी आख्यायिका सांगितली जाते की या मानाच्या अश्वावर स्वतः संत ज्ञानेश्वर महाराज विराजमान होत असतात.

### अश्वांची परंपरा

» माऊलींच्या पालखी सोहळ्यात ज्ञानेश्वर महाराज माऊलींच्या रथापुढे अश्व चालत असतो तो माऊलींचा अश्व. जरिपटका घेऊन अश्वस्वार असतो तो स्वाराचा अश्व असे दोन अश्व सोहळ्यात असतात. १८३२ मध्ये हैबतबाबा आरफळकर यांनी माऊलीचा पालखी सोहळा सुरू केला तेव्हा शितोळे सरकारांनी या सोहळ्यास राजाश्रय दिला. त्यानुसार शितोळे सरकारांच्या तंबूत माऊलींच्या पादुकांचा मुक्काम, नैवेद्य, समाज आरतीसाठी उपस्थिती, वारीतील न्याय निवाडा शितोळे सरकारांच्या ध्वजाखाली होणे हे रितीरिवाज कायम आहेत. सोहळ्यात रोज पहाटे चार वाजता अश्वास निमंत्रण द्यायला चोपदार जातात. त्यानंतर साडेपाच वाजता हा अश्व दर्शनासाठी माऊलींच्या पादुकांजवळ येतो. त्यावेळी त्याच्या गळ्यात पुष्पहार घातला जातो. तिथून तो पुढे चालण्यास मार्गस्थ होतो.

# 'वाहतूक कोंडीमुक्त' भोसरी मतदार संघासाठी 'ॲक्शन प्लॅन'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार, वाहतूकसंबंधी सर्व विभागांची महत्त्वपूर्ण बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

"वाहतूक कोंडी मुक्त" भोसरी विधानसभा मतदार संघासाठी महापालिका, पोलीस प्रशासन आणि संबंधित सर्व विभागांनी सर्वसमावेशन 'ॲक्शन प्लॅन' तयार करण्यात येणार आहे. तसेच, खासगी बस यांचे थांबे निश्चित केले जाणार आहेत. वाहतूक सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली आहे. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील वाहतूक समस्यांबाबत आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका प्रभारी आयुक्त तथा 'पीएमआरडीए'चे आयुक्त राहुल महिवाल, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, महापालिका मुख्य अभियंता मकरंद निकम, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त भास्कर डेरे, सर्व पोलीस निरीक्षक, पीएमपीएमएल अधिकारी, महावितरण अधिकारी, आरटीओ अधिकारी, स्थापत्य, उद्यान विभाग आणि क्षेत्रीय अधिकारी आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अपघाताचे हॉट स्पॉट आणि त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी नाशिक फाटा ते मोशीपर्यंत मोठ्या प्रमाणात झाडे आहेत. काही झाडे जीर्ण झाल्यामुळे येत्या पावसाळ्यात काही ठिकाणी पडण्याची शक्यता आहे, तर ती धोकादायक झाडांचे पुन:रोपण करावे. आवश्यक त्या ठिकाणी छाटई करण्याची सूचना वाहतूक पोलिसांनी केली. आवश्यकतेनुसार पी-वन आणि पी-टू याचे पार्किंग नियोजन करावे. अनेक ठिकाणी सिग्नलजवळ किंवा सिग्नल उभारण्यासाठी रस्त्याची खोदाई होते आणि डागडुजी न केल्यामुळे तिथे खड्डा निर्माण होतो. त्यामुळे वाहतुकीस अडथळा करणारे खड्डे तात्काळ बुजवावेत, अशी सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आली.



### धोकादायक डीपी हटवण्याची कारवाई...

» देहू फाटा ते जगताप कार्यालयपर्यंत दोन इलेक्ट्रिक पोल आहेत ते काढून घेण्यात यावेत. ममता पार्क, दिघी येथील धोकादायक डीपी हटवावेत. आवश्यकतेनुसार पर्यायी रस्ते म्हणून दुसऱ्या रस्त्याकडे वाहतूक वळवणे. रिवर चौक चिखली येथील डिव्हायडर पूर्ण करणे. डायमंड चौक, कुदळवाडी येथील मोईला जाणारा रस्ता छोटा असल्यामुळे ट्राफिक समस्या नेहमीची असते तेथे कर्मचारी वाढवणे आणि रस्ता मोठा करणे. देहू-आळंदी रोडवर पाणीपुरवठा विभागाचे पाईप पडलेले आहेत. ते तात्काळ उचलून घेण्यात यावेत, अशा सविस्तर सूचनाही आमदार लांडगे यांनी केल्या आहेत. .

> शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणांसह पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा यांनी समन्वय साधून कारवाई करावी. बसथांबे आणि रिक्षाथांबे निश्चित करून त्यांचे अनुपालन करण्यासाठी संबंधितांना सूचना कराव्या. शहरातील धोकादायक झालेली झाडे, पालखी मार्गातील अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावेत. शहरातील पथारीवाले महापालिकेने त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी गाड्या लावतील याची दक्षता घ्यावी. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुढील ९० दिवस अतिशय महत्वाचे असून प्रशासनाने त्याबाबत दक्ष राहावे.
>
> - राहुल महिवाल, आयुक्त पीएमआरडीए, पिंपरी-चिंचवड महापालिका.

### चुकताहेत पाणीपुरवठ्याचे अंदाज

» वाहतूक वर्दळीच्या ठिकाणी, शाळा, प्रशासकीय कार्यालयाच्या ठिकाणी अवजड वाहनांना नियमाप्रमाणे सकाळी 10 ते रात्री 10 पर्यंत बंदी असावी. तसेच, अवैधरित्या अवजड वाहने लोकवस्तीच्या ठिकाणी उभा केलेली असतात. त्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वाहतूक सक्षम करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वय करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे. महानगरपालिकेने १५० वार्डन वाढवून देण्याची विनंती पोलीस प्रशासनाने केली आहे. त्यावर कार्यवाही करावी. भोसरी चौक, चऱ्होली चौक, चिखली चौक, तळवडे चौक, इडूळगाव चौक, ममता चौक, दिघी येथील खड्डे त्वरित बुजूवण्यात आले आहेत.

> वाहतूक कोंडी मुक्त शहर करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. समाविष्ट गावांसह दाट लोकवस्ती असलेल्या परिसरात वाहतुकीचे सुक्ष्म नियोजन करण्याबाबत प्रशासनाला सूचना केल्या आहेत. महापालिका, वाहतूक पोलीस, आरटीओ, पीएमपीएमएल, एमएसईबी अशा सर्वच विभागांनी मान्सूनच्या धर्तीवर सतर्क राहणे आवश्यक आहे. त्यासाठी एकत्रितपणे वाहतूक सक्षमीकरणासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करणार आहोत. वाहतूक कोंडी मुक्त मतदारसंघ करण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे व आपल्या सूचना निश्चित कळवाव्यात. पुणे-नाशिक नाशिक रोड व कॅनबे चौक- चिखली, पुणे नाशिक रोडवर ट्रॅफिक वॉर्डनसह अतिरिक्त ट्रॅफिक पोलिस वाढवण्यात येणार आहेत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# मावळ तालुक्यातील अनेक गावांना भूस्खलनाचा धोका!

## मावळ तालुक्यात 'तळई', 'माळीण' सारख्या दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का ?

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील भाजे, पाटण, ताजे, बोरज, देवघर, वेहेरगाव, शिलाटणे, जेवरेवाडी, देवले, नेसावे, भुशी, माऊ कळकराई, तुंग, लोहगड, पाले (ना. मा.), मोरमारेवाडी, जांभवली, घोणशेत, साई व वाऊंड आदी गावांना भूस्खलनाचा धोका आहे. डोंगर पायथ्याशी वसलेली ही गावे पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत.

अनियंत्रित वृक्षतोड, अवैधरित्या होणारे उत्खनन, नैसर्गिक प्रवाहांचे दिशाबदल यांमुळे भूस्खलनाचा धोका अधिक वाढला असून प्रशासनाने यावर वेळीच उपाययोजना न केल्यास मावळातही तळई, माळीण सारखी मोठी दुर्घटना घडू शकते.

माळीण दुर्घटनेनंतर जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया ,कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि जी.एस.डी.ए या संस्थानी धोकादायक गावांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून मावळातील भुशी, माऊ, ताजे, बोरज, कळकराई, मालेवाडी, तुंग, लोहगड या ८ गावांना भूस्खलनाचा धोका असून त्यांचे पुनर्वसन करण्याचे सुचविले होते.

त्यावेळी या ८ गावांचा पुनर्वसनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजूरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविला आणि त्यास मंजूरी देखील मिळाली होती. या गावांचे लवकरच पुनर्वसन करण्यात येणार असे सांगण्यात आले, मात्र अद्याप एकाही गावाचे पुनर्वसन झालेले नाही.



### मोठी दुर्घटना झाल्यावरच प्रशासन जागे होणार का?

» मावळात वरील ८ गावांवर भूस्खलनाच्या धोक्याची टांगती तलवार आहे. मागील पावाळ्यात तुंग येथील भूस्खलनात एक घर जमीनदोस्त झाले होते.कार्ला येथील एकवीरा मंदिराजवळ दरड कोसळली होती. तर काही वर्षांपुर्वी नेसावे गावावरील डोंगराला सुमारे दोन फुट रुंद लांबलचक खोल चर पडून हा भाग मुख्य डोंगरापासून वेगळा झालाय. पाले (ना. मा.) येथे दोन वर्षांपुर्वी वीज पडून चीर पडली होती.

### भूस्खलन होण्याची कारणे

» मावळात अवैध उत्खनन, वेगवेगळ्या प्रकल्पासाठी झालेले भूसंपादन, बेसुमार वृक्षतोड, धनिकांनी बांधकामासाठी केलेला निसर्गाचा ऱ्हास, या ना अनेक कारणांनी नैसर्गिक प्रवाहांची बदललेली दिशा आदी घटक भूस्खलनासाठी कारण ठरत आहेत. विशेषत: डोंगरभागातील गावांमध्ये हे बदल दिसत आहेत. त्यामुळे डोंगर, दऱ्यात वसलेल्या गावांचे लवकर पुनर्वसन करणे ही काळाची गरज आहे.

# पाण्याच्या टाकी प्रकरणाची सखोल चौकशी करा

## अंगणवाडीच्या लहान मुलांच्या जिवीतासही धोका निर्माण केल्याचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील ग्रामपंचायत शिरसवडीच्या हद्दीतील मौजे गावडेवाडी येथे पाणीच्या टाकीसाठी खरेदी केलेल्या जागेत पाण्याच्या टाकीचे बांधकाम न करता आर्थिक नफ्यापोटी एका खाजगी जागेत पाण्याच्या टाकीचे बांधकाम करून अंगणवाडीच्या लहान मुलांच्या जिवीतासही धोका निर्माण केल्याचा आरोप करीत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थ दत्तात्रेय गावडे यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे केली आहे.

याबाबतीत सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय गावडे यांनी सांगितले की ग्रामपंचायत शिरसवडीच्या हद्दीतील मौजे गावडेवाडी येथे जल-जीवन मिशन योजने अंतर्गत नवीन पाण्याच्या टाकीचे वांधकाम प्लॉटिंग व्यावसायिकांच्या नफ्यासाठी खाजगी जागेत करणेत आल्यामुळे, तसेच सदरील टाकीचे बांधकाम अंगणवाडी व विजेच्या डीपीच्या शेजारील जागेत करून लहान मुलांच्या जिवीतासही धोका निर्माण झाल्याचा आरोप गावडे यांनी केला आहे.



### माहिती अधिकारातून अजब माहिती उघड ..

» २० मार्च रोजी अर्ज करून महिला बालकल्याण अधिकारी यांची एन ओ सी ची मागवलेली माहिती जवळपास अडीच महिन्यांनी मिळाली. गावडेवाडी अंगणवाडी सेविका यांनी ग्रामपंचायत ची पाण्याची टाकी दोनशे फूट अंतरावर असून आहे त्यापासून अंगणवाडीस काही धोका नाही पत्र असे दिले आहे. वास्तविक टाकी ही अंगणवाडी पासून ३० फुटांपेक्षा कमी अंतरात बांधलेली आहे..

मौजे गावडेवाडी येथे पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणेकरीता ग्रामपंचायत शिरसवडीने सन २०१४ मध्ये गावडेवाडी येथील गट नंबर १२० मधील ०१ आर क्षेत्र दस्त क्रमांक ९६५०/२०१३ अन्वये बक्षीसपत्राने खरेदी केलेले आहे. ही जागा वस्ती मध्येच असताना या जागेत पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले नाही.

याशिवाय गावडेवाडी येथे अंगणवाडीचे बांधकाम करणेकरीता ग्रामपंचायत शिरसवडीने सन २०१५ मध्ये गट नंबर १२१ मधील ०२ आर क्षेत्र दस्त क्रमांक १०४०/२०१५ अन्वये बक्षीसपत्राने खरेदी केलेले असून त्या जागेत अंगणवाडीचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

गावडेवाडी येथील गट नंबर १२१ मध्येच नवीन पाण्याचा टाकीचे बांधकाम करण्यात आले असून, टाकीचे अंतर अंगणवाडी पासून केवळ ३० फुटापेक्षाही कमी असून, त्यासोबतच विजेची डीपीही अंगणवाडी पासून १५ फुटापेक्षा कमी अंतरावर बसवण्यात आलेली आहे.

नवीन पाण्याचा टाकीचे बांधकाम अंगणवाडीच्या जागेतच करण्यात येत असल्याची बाब मा. उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, पंचायत समिती हवेली, पुणे यांचे पत्राद्वारे समजली आहे. परंतु अंगणवाडीचे बांधकाम करण्यासाठी केंद्र शासनाने नियमावली जाहीर केलेली आहे त्याप्रमाणे अंगणवाडी करिता कमीतकमी १.५ आर ते २ आर जागा आवश्यक आहे. अंगणवाडीची खरेदी केलेली जागाही ०२ आर एवढीच आहे. नवीन पाण्याच्या टाकी करीता ग्रामपंचायतीने नवीन जागेची खरेदी केली नाही. जवळ असणाऱ्या अवैध प्लॉटिंग व्यवसायाला मदत व्हावी या उद्देशाने पाण्याची टाकी एका खाजगी जागेत उभी केल्याचा आरोप गावडे यांनी केला आहे.

> “ गावडेवाडी पाण्याच्या टाकी ची जागा बदलण्याबाबत ग्रामपंचायत कडून तसा प्रस्ताव ठरावा नुसार सादर करण्यात आला होता. ज्या जागेत पाण्याची टाकी बांधली आहे त्या बाबतीत शासकीय मोजणी करून तसा अहवाल पाठवण्याबाबत ग्रामपंचायतीस पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर जागेची मोजणी करून पुढील योग्य ते निर्णय घेण्यात येणार आहे.
> कलिका खरात
> - कलिका खरात, उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा पंचायत समिती हवेली

# पहिल्या दिवशी 2 कोटी 1 लाख रुपये लोकसहभागातून जमा

## जिल्ह्यातील 1630 शाळांमधील पाच हजारांपेक्षा जास्त शिक्षकांचा पुढाकार

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या पहिल्या दिवशी २ कोटी १ लाख रूपये शिक्षक व पालकांकडून लोकसहभाग उपक्रमासाठी जमा झाले आहेत.

दि.१५ जून हा शाळेचा पहिला दिवस होता. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील व शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी शिक्षकांना लोकसहभाग उपक्रमासाठी योगदान देण्याचे आवाहन केले होते. पहिल्या दिवशी गरीब, होतकरू मुलांना शैक्षणिक साहित्य देणेसाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला.

जिल्ह्यात ३६२१ शाळांपैकी १६३० शाळेतील ५३२० शिक्षकांनी पुढे येऊन स्वतः ३० लाख ८० हजार ४५५ रुपये व पालक, दानशूर व्यक्ती यांच्याकडून १ कोटी ८० लाख ७०हजार ४५० रुपये इतका मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला आहे.



या निधीतून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य घेतले. यामध्ये स्कूल बॅग, पाण्याची बाटली, वह्या, टेबल, खुर्च्या, चित्रकला वह्या, शालेय स्टेशनरी या प्रकारचे साहित्य विद्यार्थ्यांना घेण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी व पालक,अधिकारी ,ग्रामस्थ यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी १ लाख रुपये संकलन करून साहित्य वाटप केले.

सर्व पालक व शिक्षक यांनी एकत्रित काम केले तर शाळांचा भौतिक व शैक्षणिक हातभार लागेल. यासाठी शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत यांनी पुढे येऊन शैक्षणिक गुणवत्तेला हातभार लावण्याचे नाईकडे यांनी आवाहन केले.

### जिल्हा प्रशासनाकडून कौतुक

» शिक्षकांनी केलेल्या या लोकसहभाग चळवळीचे जिल्हा प्रशासनाने कौतुक केले आहे. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा हा चांगला आहे. शाळा समाजाचा भाग झाला तर शाळांचा कायापालट होईल. यासाठी शिक्षक यांनी पुढाकार घ्यावा, असे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद शाळांचा दर्जा हा चांगला आहे. शाळा समाजाचा भाग झाला, तर शाळांचा कायापालट होईल व यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी सांगितले. सर्व पालक व शिक्षक यांनी एकत्रित काम केले, तर शाळांना भौतिक व शैक्षणिक हातभार लागेल. यासाठी शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतींनी पुढे येऊन शैक्षणिक गुणवत्तेला हातभार लावावा, असे आवाहन केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील व शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी शिक्षकांना लोकसहभागाचे आवाहन केले होते. पहिल्याच दिवशी गरीब, होतकरू मुलांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला.